मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

शास्त्र ७० सन १८१४

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरि

चरित्र

चारेग ७०

चिपळूणकर चारेग

स्थळप्रत
म. सं. सं. ग्रं.

स्थळप्रत
म. सं. सं. ग्रं.

# विष्णुशास्त्री चिपळुणकर

## यांचें चरित्र.

—ooXoo—

* * * * बी. ए.

हेड मास्तर हायस्कूल *

यांनीं लिहिलें.

---

—" *Paint me as I am " said Oliver Cromwell while sitting to young Lely, "if you leave out the scars & wrinkles, I will not pay you a shilling.* "

*Macaulay's Essay on Warren Hastings.*

---

पुणें

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें ठेविले आहेत.

---

किंमत कापडाचे बाइंडिंग सह १॥ रुपया.

,, कागदाचे ,, १। रुपया.

# विष्णुशास्त्री चिपळुणकर

## यांचें चरित्र.

* * * * बी. ए.

हेड मास्तर हायस्कूल

यांनीं लिहिलें.

---

—" *Paint me as I am*" *said Oliver Cromwell while sitting to young Lely,* "*if you leave out the scars & wrinkles, I will not pay you a shilling.*"

*Macaulay's Essay on Warren Hastings.*

पुणें

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें ठेविले आहेत.

किंमत कापडाचे बाइंडिंग सह १॥ रुपया.

" कागदाचे " १। रुपया.

पुणें येथें " सत्यप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १३ | टीप | Cipher | Cypher |
| १६ | ७ | असत | होते |
| २१ | २५ | म्हातारा | म्हातारा बिचारा |
| २२ | १३ | एकदां | कधीं कधीं |
| २८ | ३ | नाहीं, म्हणून | नाहीं म्हणून, |
| २८ | ९ | घेऊन | घेऊन जाऊन |
| २८ | २० | –खाची | –खाचा |
| २९ | १ | मंडळीहीं | मंडळीची |
| ३३ | इंग्रजी कविता | Howy | Hoory |
| ४६ | ९ | प्रसारामळें | प्रसारामुळें |
| ४९ | ८ | तऱ्हेनें | तऱ्हेनें हीं |
| ५१ | ६ | वगर | वगैरे |
| ५५ | ८ | बनियंत | बनियन्स |
| ६१ | ११ | नाहीं | नसे |
| ६३ टीप | २ | जें | तें |
| ६३ टीप | २ | आहे | आहे व |
| ८५ | टीप | नस १८८९ सालीं | यंदाचे सालापासून |
| ८७ | २४ | असे | असे. |
| ९७ | ६ | मेघानें | मेघांनीं |
| ९९ | १ | फटाकीही | फटाकाही |
| १३६ | ८ | मूळें | फळें |
| १३९ | २५ | पाहणारे | पाहण्यांत |
| १४६ | २५ | घरीं | भोंवतीं |
| १४७ | ७ | जी | हीं जीं |
| १४७ | ७ | होता | होतीं |

पुणें येथें " सत्यप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १३ | टीप | Cipher | Cypher |
| १६ | ७ | असत | होते |
| २१ | २५ | म्हातारा | म्हातारा बिचारा |
| २२ | १३ | एकदां | कधीं कधीं |
| २८ | ३ | नाहीं, म्हणून | नाहीं म्हणून, |
| २८ | ९ | घेऊन | घेऊन जाऊन |
| २८ | २० | —खाची | —खाचा |
| २९ | १ | मंडळीहीं | मंडळीची |
| ३३ | इंग्रजी कविता | Howy | Hoory |
| ४६ | ९ | प्रसारामळें | प्रसारामुळें |
| ४९ | ८ | तऱ्हेनें | तऱ्हेनें हीं |
| ५१ | ६ | वगर | वगैरे |
| ५५ | ८ | बनियंत | बनियन्स |
| ६१ | ११ | नाहीं | नसे |
| ६३ टीप | २ | जें | तें |
| ६३ टीप | २ | आहे | आहे व |
| ८५ | टीप | नस १८८९ सालीं | यंदाचे सालापासून |
| ८७ | २४ | असे | असे. |
| ९७ | ६ | मेघानें | मेघांनीं |
| ९९ | १ | फटाकीही | फटाकाही |
| १३६ | ८ | मूळें | फळें |
| १३९ | २५ | पाहणारे | पाहण्यांत |
| १४६ | २५ | घरीं | भोंवतीं |
| १४७ | ७ | जी | हीं जीं |
| १४७ | ७ | होता | होतीं |

| | | | |
|---|---|---|---|
| १४७ | ८ | तो | तीं |
| १५६ | १ | सवाचें | सर्वांचें |
| १५८ | ९ | आक्टोबरचे | आक्टोबरलां |
| १७१ | २ | विद्यालयनि | विद्यालयीन |
| १७२ | ९-१० | प्रीतितीचे | प्रीतीचे |
| १७८ | २३ | Newspaper | Newspapers |
| १७८ | २५ | Then | There |
| १८७ | १४ | तेथेंही | येथेंही |
| १८७ | १५ | निघून | निघून जाऊन |
| १८७ | १७ | चगळीची | चंगाळीची |
| २२९ | १३ | यांनीं | त्यांनीं. |
| २३० | १५ | आली | आणिली |
| २३५ | ८ | Divers | Diverse |
| २५८ | २२ | दृष्टीस; | दृष्टीस पडते; |
| २६४ | ५ | त्यांत | त्यांस |
| २६४ | १५ | कळवीतांना | कळवीत ना |
| २६५ | ४ | पडतां | पाडतां |
| २६५ | १८ | तें | जें |
| २६५ | २१ | उचलिली | उचलिला |
| २७३ | १२ | Clear | Clever |
| २७५ | २३ | मुख्य गोष्टींचें मुख्य | मुख्य मुख्य गोष्टींचें |
| २७८ | ३ | उडायाचा | उठायाचा. |
| २८४ | २ | त्यांचे | आमचे |
| २८४ | ४ | त्यांचे | त्यानें |
| २९० | २१ | आज्ञादर्शक | आज्ञादशक |
| ३२० | १६ | सांगून | सांगितलें. आतां |
| ३२४ | ३० | प्रतिपक्षाची | प्रतिपक्ष्याची. |
| ३२५ | ३० | वरता | वरात |
| ३२६ | २३ | केल | केला |
| ३३० | ४ | मटकून | मुटकून |
| ३३१ | ७ | येथें | तेथें |

| | | | |
|---|---|---|---|
| | १७ | विन्मुख | विमुख |
| ३४८ | ९ | नसे | नसेच |
| ३४९ | १० | आकाटोविकट | अकटोविकट |
| ३५१ | ११-१२ | स्वालंबन, प्रीति | स्वावलंबन प्रीति |
| ३५९ | ८ | नाहींसे होऊन | झाले नसते व |
| ३६३ | १९ | ड़मरावती | आकोलें |
| ३६४ | 20 | no | |
| 1 | 5 | writer | the writer |
| 4 | 35 | than | |
| 4 | 19 | Eliphas | Elephas |
| 6 | 31 | well | well as |
| 8 | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४७ | ८ | तो | तीं |
| १५६ | १ | सवाचं | सर्वांचें |
| १५८ | ९ | आक्टोवरचे | आक्टोवरला |
| १७१ | २ | त्रियालयनि | विद्यालयींन |
| १७२ | ९-१० | प्रीतितीचे | प्रीतीचे |
| १७८ | २३ | Newspaper | Newspapers |
| १७८ | २५ | Then | There |
| १८७ | १४ | तेथेंही | येथेंही |
| १८७ | १५ | निघून | निघून जाऊन |
| १८७ | १७ | चगळीची | चंगाळीची |
| २२९ | १३ | यांनीं | त्यांनीं. |
| २३० | १५ | आली | आणिली |
| २३५ | ८ | Divers | Diverse |
| २५८ | २२ | दृष्टीस; | दृष्टीस पडते; |
| २६४ | ५ | त्यांत | त्यांस |
| २६४ | १५ | कळवीतांना | कळवीत ना |
| २६५ | ४ | पडतां | पाडतां |
| २६५ | १८ | तें | जें |
| २६५ | २१ | उचलिली | उचलिला |
| २७३ | १२ | Clear | Clever |
| २७५ | २३ | मुख्य गोष्टींचें मुख्य | मुख्य मुख्य गोष्टींचें |
| २७८ | ३ | उड्ायाचा | उठायाचा. |
| २८४ | २ | त्यांचे | आमचे |
| २८४ | ४ | त्यांचे | त्यानें |
| २९० | २१ | आज्ञादर्शक | आज्ञादर्शक |
| ३२० | १६ | सांगून | सांगितलें. आतां |
| ३२४ | ३० | प्रतिपक्षाची | प्रतिपक्ष्याची. |
| ३२५ | ३० | वरता | वरात |
| ३२६ | २३ | केल | केला |
| ३३० | ४ | मटकून | मुटकून |
| ३३१ | ७ | येथें | तेथें |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४८ | १७ | विन्मुख | विमुख |
| ३४९ | ९ | नसे | नसेच |
| ३५१ | १० | आकाटोविकट | अकटोविकट |
| ३५९ | ११-१२ | स्वालंबन, प्रीति | स्वावलंबन प्रीति |
| ३६३ | ८ | नाहींसे होऊन | झाले नसते व |
| ३६४ | १९ | उमरावती | आकोलें |
| 1 | 20 | no | . |
| 4 | 5 | writer | the writer |
| 4 | 35 | than | . |
| 6 | 19 | Eliphas | Elephas |
| 8 | 31 | well | well as |

| | | | |
|---|---|---|---|
| १४७ | ८ | तो | तीं |
| १५६ | १ | सवाचे | सर्वांचें |
| १५८ | ९ | आक्टोबरचे | आक्टोबरला |
| १७१ | २ | निद्यालयनि | विद्यालयीन |
| १७२ | ९.१० | प्रीतितीचे | प्रीतीचे |
| १७८ | २३ | Newspaper | Newspapers |
| १७८ | २५ | Then | There |
| १८७ | १४ | तेथेंही | येथेंही |
| १८७ | १५ | निघून | निघून जाऊन |
| १८७ | १७ | चगळीची | चंगाळीची |
| २२९ | १३ | यांनीं | त्यांनीं. |
| २३० | १५ | आली | आणिली |
| २३५ | ८ | Divers | Diverse |
| २५८ | २२ | दृष्टास; | दृष्टीस पडते; |
| २६४ | ५ | त्यांत | त्यांस |
| २६४ | १५ | कळवीतांना | कळवीत ना |
| २६५ | ४ | पडतां | पाडतां |
| २६५ | १८ | तें | जें |
| २६५ | २१ | उचलिली | उचलिला |
| २७३ | १२ | Clear | Clever |
| २७५ | २३ | मुख्य गोष्टींचें मुख्य | मुख्य मुख्य गोष्टींचें |
| २७८ | ३ | उडायाचा | उठायाचा. |
| २८४ | २ | त्यांचे | आमचे |
| २८४ | ४ | त्यांचे | त्यानें |
| २९० | २१ | आज्ञादर्शक | आज्ञादशक |
| ३२० | १६ | सांगून | सांगितलें. आतां |
| ३२४ | ३० | प्रतिपक्षाची | प्रतिपक्ष्याची. |
| ३२५ | ३० | वरता | वरात |
| ३२६ | २३ | केल | केला |
| ३३० | ४ | मटकून | मुटकून |
| ३३१ | ७ | येथें | तेथें |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४८ | १७ | विन्मुख | विमुख |
| ३४९ | ९ | नसे | नसेच |
| ३५१ | १० | आकाटोविकट | अकटोविकट |
| ३५९ | ११-१२ | स्वालंबन, प्रीति | स्वावलंबन प्रीति |
| ३६३ | ८ | नाहींसे होऊन | झाले नसते व |
| ३६४ | १९ | इमरावती | आकोलें |
| 1 | 20 | no | . |
| 4 | 5 | writer | the writer |
| 4 | 35 | than | . |
| 6 | 19 | Eliphas | Elephas |
| 8 | 31 | well | well as |

# हें पुस्तक

## विष्णुशास्त्री यांनीं सुरू केलेले उद्योग–

न्यूइंग्लिशस्कूल,

केसरी, मराठा, चित्रशाळा

व

किताबखाना–

हे ज्या सद्गृहस्थांनीं त्यांचे मागें चांगले रीतीनें चालविले आहेत त्यांस

व

" सद्वर्तन प्रवर्तक मंडळी पुणें, "

जिनें हें पुस्तक लिहिण्यास ग्रंथकर्त्यास अमोलिक संधि आणून दिली, तीस,

पूर्ण आदरानें अर्पण केलें असे.

ग्रंथकर्ता.

सं-पं. ९८

# अनुक्रमणिका.


| | | | पान. |
|---|---|---|---|
| भाग | १ | बालपण. .... .... .... | १ |
| भाग | २ | डेक्कन कालेजांतील विद्याभ्यास. .... | ३३ |
| भाग | ३ | अध्यापन. .... .... .... | ८० |
| भाग | ४ | निबंध मालेचा आरंभ. .... .... | १०८ |
| भाग | ५ | विचार स्वातंत्र्य. .... .... | १४४ |
| भाग | ६ | रत्नांगिरीस बदली. .... .... | १७६ |
| भाग | ७ | न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना. .... | २३० |
| भाग | ८ | अंत. .... .... .... .... | २२९ |
| भाग | ९. | भाषासेवा व देशसेवा. .... .... | ३१५ |

# प्रस्तावना.

विष्णुशास्त्री वारून आज बारा वर्षें झालीं. इतके अवकाशांत त्यांचीं लहान मोठीं अशीं तीन चरित्रें आमचे पाहण्यांत आलीं; एक निबंधचंद्रिका मासिकपुस्तकांतील, दुसरें बालबोधांतील व तिसरें रा. बेलसरे यांनीं स्वतंत्र असें केलेलें पुस्तक हें होय. पहिले दोन लेख हे त्या त्या मासिक पुस्तकांतूनच आले असून ते पुस्तकरूपानें निराळे असे प्रसिद्ध न झाल्याकारणानें ते आतां फारसे लोकांपुढें नाहींत. तिसरें चरित्र हें वरील दोन्ही लेखांपेक्षां अधिक विस्तृत असून त्यांतील विवेचनही अधिक यथास्थित आहे. रा. बेलसरे यांनीं विष्णुशास्त्री यांस जरी स्वतः पाहिलें नव्हतें तरी त्यांचे ग्रंथ वाचून त्यांचे ठिकाणीं त्यांस विलक्षण पूज्यभाव उत्पन्न झाला व विष्णुशास्त्री यांचेविषयीं माहिती मिळवून त्यांचें चरित्र लिहावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. परंतु त्यांस यथास्थित माहिती न मिळाल्यामुळें त्यांस आपले पुस्तकास ‘विष्णुशास्त्री यांचे चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप’ हाणूनच नांव द्यावें लागलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचें चरित्र ज्यांत त्यांचें जीवनवृत्त सविस्तर व विश्वसनीय असें दिलें आहे, ज्यांत त्यांचे ग्रंथांचें पूर्ण परीक्षण केलें आहे व ज्यांत त्यांचे हातून महाराष्ट्र भाषेची व एकंदर महाराष्ट्रीय लोकांची कोणकोणती सेवा घडून आली वगैरे गोष्टींचें निरूपण केलें आहे, असें पूर्ण छापून प्रसिद्ध न झाल्यामुळें विष्णुशास्त्री यांस पुष्कळ चहाणारे लोकांस अशा

[library stamps]

# प्रस्तावना.

विष्णुशास्त्री वारून आज बारा वर्षें झालीं. इतके अवकाशांत त्यांचीं लहान मोठीं अशीं तीन चरित्रें आमचे पाहण्यांत आलीं; एक निबंधचंद्रिका मासिकपुस्तकांतील, दुसरें बालबोधांतील व तिसरें रा. बेलसरे यांनीं स्वतंत्र असें केलेलें पुस्तक हें होय. पहिले दोन लेख हे त्या त्या मासिक पुस्तकांतूनच आले असून ते पुस्तकरूपानें निराळे असे प्रसिद्ध न झाल्याकारणानें ते आतां फारसे लोकांपुढें नाहींत. तिसरें चरित्र हें वरील दोन्ही लेखांपेक्षां अधिक विस्तृत असून त्यांतील विवेचनही अधिक यथास्थित आहे. रा. बेलसरे यांनीं विष्णुशास्त्री यांस जरी स्वत: पाहिलें नव्हतें तरी त्यांचे ग्रंथ वाचून त्यांचे ठिकाणीं त्यांस विलक्षण पूज्यभाव उत्पन्न झाला व विष्णुशास्त्री यांचेविषयीं माहिती मिळवून त्यांचें चरित्र लिहावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. परंतु त्यांस यथास्थित माहिती न मिळाल्यामुळें त्यांस आपले पुस्तकास 'विष्णुशास्त्री यांचे चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप' ह्मणूनच नांव द्यावें लागलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचें चरित्र ज्यांत त्यांचें जीवनवृत्त सविस्तर व विश्वसनीय असें दिलें आहे, ज्यांत त्यांचे ग्रंथांचें पूर्ण परीक्षण केलें आहे व ज्यांत त्यांचे हातून महाराष्ट्र भाषेची व एकंदर महाराष्ट्रीय लोकांची कोणकोणती सेवा घडून आली वगैरे गोष्टींचें निरूपण केलें आहे, असें पूर्ण छापून प्रसिद्ध न झाल्यामुळें विष्णुशास्त्री यांस पुष्कळ चहाणारे लोकांस अशा

# प्रस्तावना.

विष्णुशास्त्री वारून आज बारा वर्षें झालीं. इतके अवकाशांत त्यांचीं लहान मोठीं अशीं तीन चरित्रें आमचे पाहण्यांत आलीं; एक निबंधचंद्रिका मासिकपुस्तकांतील, दुसरें बालबोधांतील व तिसरें रा. बेलसरे यांनीं स्वतंत्र असें केलेलें पुस्तक हें होय. पहिले दोन लेख हे त्या त्या मासिक पुस्तकांतूनच आले असून ते पुस्तकरूपानें निराळे असे प्रसिद्ध न झाल्याकारणानें ते आतां फारसे लोकांपुढें नाहींत. तिसरें चरित्र हें वरील दोन्ही लेखांपेक्षां अधिक विस्तृत असून त्यांतील विवेचनही अधिक यथास्थित आहे. रा. बेलसरे यांनीं विष्णुशास्त्री यांस जरी स्वतः पाहिलें नव्हतें तरी त्यांचे ग्रंथ वाचून त्यांचे ठिकाणीं त्यांस विलक्षण पूज्यभाव उत्पन्न झाला व विष्णुशास्त्री यांचेविषयीं माहिती मिळवून त्यांचें चरित्र लिहावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. परंतु त्यांस यथास्थित माहिती न मिळाल्यामुळें त्यांस आपले पुस्तकास ‘ विष्णुशास्त्री यांचे चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप ’ ह्मणूनच नांव द्यावें लागलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचें चरित्र ज्यांत त्यांचें जीवनवृत्त सविस्तर व विश्वसनीय असें दिलें आहे, ज्यांत त्यांचे ग्रंथांचें पूर्ण परीक्षण केलें आहे व ज्यांत त्यांचे हातून महाराष्ट्र भाषेची व एकंदर महाराष्ट्रीय लोकांची कोणकोणती सेवा घडून आली वगैरे गोष्टींचें निरूपण केलें आहे, असें पूर्ण छापून प्रसिद्ध न झाल्यामुळें विष्णुशास्त्री यांस पुष्कळ चहाणारे लोकांस अशा

पुस्तकाची बरीच उणीव वाटत होती. शेवटीं शास्त्री बोवांचे मरण दिवसाचे स्मरणार्थ जो मेळा दरवर्षी पुण्यास भरत असतो त्यांत १८९१ सालीं मार्च महिन्यांत वरील चरित्राची गोष्ट निघून ही उणीव अवश्य दूर झाली पाहिजे अशाविषयीं चर्चा चालली असतां पैशाशिवाय हें काम होणार नाहीं अशावर ही गोष्ट येऊन ठेपली. त्या वेळीं विष्णुशास्त्री यांचे स्नेही रा. वासुदेवराव जोशी हे हजर होते. त्यांनीं लागलेंच अशा कामा-करितां दोनशें रुपये बक्षीस देण्याचें कबूल केलें. त्यावरून शास्त्रीबोवांचे स्मारक फंड कमेटीनें वरील चरित्राबद्दल वर्तमान पत्रांत जाहिरात देऊन त्यांजकडे १८९२ एप्रेल अखेर पुस्तकें पाठविण्यास कळविलें. ही जाहिरात प्रसिद्ध होतांच कित्येक होतकरू ग्रंथकार तें काम करण्यास सरसावून त्यांपैकीं दोघां तिघांनीं आह्मास विष्णुशास्त्री यांची माहिती देण्याबद्दल पत्रें पाठविलीं. परंतु चरित्र जें लिहिणें तें चरित्रनायकाबद्दल पत्रांनीं माहिती लिहून आणून किंवा ती तोंडानें ऐकून लिहितां येणार नाहीं; चरित्र लिहिणारांचा चरित्रनायकाशीं स्वतः पुष्कळ दिवस परिचय असला पाहिजे, त्याजविषयींची सर्व हकीगत त्यानें स्वतः डोळ्यांनीं पाहिली असली पाहिजे, त्याचा स्वभाव, त्याची चालचालणूक, त्याचे लोकोत्तर गुण, त्याचे ठळक ठळक अवगुण, त्याच्या अभिरुची, वगैरे सर्व लहान मोठ्या गोष्टी चरित्रकारानें स्वतः पाहिल्या असल्याशिवाय व त्याचे एकंदर कृतीबद्दल त्याचे ठिकाणीं योग्य पूज्यभाव असल्या-शिवाय त्यास तें चरित्र चांगलें लिहितां येणार नाहीं; असा आमचा समज असल्या कारणानें त्या वेळीं वरील गृहस्थांस आह्मास येवढा मोठा मजकूर पत्रोपत्रीं लिहून कळवितां येणार

नाहीं ह्मणून कळवावें लागलें. या पूर्वीं रा. बेलसरे यांनींही आपले पुस्तकांत कांहीं शोध घालतां येतील तर घाला ह्मणून आमचेकडे त्यांनीं आपले पुस्तकांचीं पहिलीं कांहीं प्रुफें पाठविलीं होतीं. परंतु प्रुफांत फेरबदल किंवा शोध असे फारच थोडके करितां येण्यासारखे असल्यामुळें कांहीं प्रुफांनंतर तें काम तसेंच राहिलें.

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचीं प्रसिद्ध झालेलीं चरित्रें अपूर्ण व कित्येक ठिकाणीं चुकलेलीं पाहून आम्हास बरें वाटत नव्हतें; परंतु या पूर्वीं आपण मराठींत कधीं कांहीं लिहिलें नसल्यामुळें व येवढें काम आपले हातून झेंपणार नाहीं असें वाटत असल्यामुळें कित्येक दिवस आह्मी तसेंच स्वस्थ राहिलों. परंतु पुढें कांहीं महिन्यांनीं आमचे पूर्वीचे शिष्य रा. चिंतामण हरी लेले यानीं विष्णुशास्त्री यांचे चरित्राबद्दलची जाहिरात वर्तमानपत्रांतून वाचून त्यांनीं तें लिहिण्याचें मनांत आणिलें; व त्याची सामुग्री आम्हापासून मिळेल ह्मणून ते आह्माकडे आले. ते एक दोनदां मुद्दाम इतके लांब आल्या कारणानें त्यांची भीड आम्हास तोडवेना. तथापि माहिती सांगून ती आपले मनाप्रमाणें त्यांस वठवितां येणार नाहीं असें वाटून, व रा. लेले यांस विचारतां ५० पानें मजकूर हावा आहे असें कळल्यावरून तो मजकूर सांगण्यापेक्षां आह्मी तो लिहूनच देतों व मग त्यांत तुह्मी कमीजास्त काय करायाचें तें करून पुस्तक लिहावें, असें त्यांस आम्ही सांगितलें, यावेळीं जानेवारी महिना सुरू झाला असून पुस्तकाची मुदत फक्त चारच महिने राहिली होती. तथापि पन्नास पानें येवढे वेळांत सहज लिहून होतील म्हणून आम्हीं प्रस्तुतचें चरित्र लिहिण्यास हातीं घेतलें. परंतु हळू हळू मजकूर जसजसा अधिकाधिक

सुचत चालला व पूर्वी ऐकलेल्या आख्यायिका एकामागून एक आठवूं लागल्या, तसतसा मूळ पन्नास पानांचा बेत प्रथम दिडिशें, नंतर अडीचशें व नंतर साडेतीनशें पानांवरही जात चालला; आणि पुस्तक जसजसें चांगलें वठत चाललें असें आमचे दृष्टीस पडूं लागलें तसतसें आमचे मनांत असें येत चाललें कीं, पुस्तक रचण्याबद्दल जाहीरात असल्या-मुळें बरींच पुस्तकें लिहिलीं जाऊन त्यांतून एकादें कमे-टीकडून पसंत होऊन तें प्रसिद्ध केलें जाईल; परंतु त्यांतही पुष्कळ चुकीची माहिती, अपुरें विवेचन वगैरे येऊन शेवटीं विष्णुशास्त्री यांचें चरित्र यथास्थित असें निघणार नाहीं; तेव्हां होईल तितकें करून राहिलेले अवकाशांत आपलें पुस्त-कही संपूर्ण करण्याचा आम्हीं विचार केला. पुढें तें सर्व तयार झाल्यावर आम्हीं तें आपले दोन तीन मित्रांस दाखविलें; तेव्हां त्यांनीं तें आपले अल्पवयी शिष्याचें नांवावर प्रसिद्ध न करतां तें स्वतःचेच नांवानें प्रसिद्ध करण्यास सुचविलें. याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं तसें केल्यावांचून या चरित्रांतील माहिती विशेष विश्वसनीय आहे असें वाचकांस सहसा वाटणार नाहीं. आमचे मित्रांचें हें ह्मणणें आह्मासही सयुक्तिक दिसलें व हें पुस्तक मुद्रणांत तयार झालें होतेंच तेव्हां जाहीरात दिल्याप्रमाणें दुसरीं पुस्तकें आलीं होतीं त्यांत हेंही आम्ही परीक्षणास पाठवून दिलें. मात्र पूर्वीपासून हें काम बक्षीसाचे इच्छेनें केलें नसल्यामुळें आपले पुस्तकास बक्षीस मिळाल्यास त्यांतील कांहीं रक्कम रा. लेले यांस देऊन बाकी राहिलेले पैसे पुस्तक छापतांना त्याचे खर्चांतून वजा घालून तेवढ्यानें पुस्तक जितकें स्वस्त होईल तितकें करावें असा आह्मी आपले मनांत

संकल्प केला. पुढें बक्षीस मिळाल्यावर रा. वासुदेवराव जोशी यांस तो संकल्प कळविल्यावरून त्याप्रमाणें रकमेची व्यवस्था करण्याचें त्यांनीं कबूल केलें. येणेंप्रमाणें या पूर्वी मनांत मुळींच कल्पनाही नसतां अगदीं सहज रीतीनें या पुस्तकाचे रचनेचा योग कसा आला याची हकीकत आहे.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं रा. रा. गणेश अनंत वैद्य, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मल्हार खंडेराव चिटणीस, रामचंद्र सदाशीव लेले, गंगाधर सखाराम घाटे, व वासुदेव गणेश जोशी यांपैकीं कित्येकांनीं उत्तेजन देऊन व कित्येकांनीं पुस्तक तपासून जें सहाय केलें त्याबद्दल त्या सर्वांचा ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

**ग्रंथकर्ता.**

सुचत चालला व पूर्वी ऐकलेल्या आख्यायिका एकामागून एक आठवूं लागल्या, तसतसा मूळ पन्नास पानांचा बेत प्रथम दीडशें, नंतर अडीचशें व नंतर साडेतीनशें पानांवरही जात चालला; आणि पुस्तक जसजसें चांगलें वठत चाललें असें आमचे दृष्टीस पडूं लागलें तसतसें आमचे मनांत असें येत चाललें कीं, पुस्तक रचण्याबद्दल जाहिरात असल्या-मुळें बरींच पुस्तकें लिहिलीं जाऊन त्यांतून एखादें कमे-टीकडून पसंत होऊन तें प्रसिद्ध केलें जाईल; परंतु त्यांतही पुष्कळ चुकीची माहिती, अपुरें विवेचन वगैरे येऊन शेवटीं विष्णुशास्त्री यांचें चरित्र यथास्थित असें निघणार नाहीं; तेव्हां होईल तितकें करून राहिलेले अवकाशांत आपलें पुस्त-कही संपूर्ण करण्याचा आम्हीं विचार केला. पुढें तें सर्व तयार झाल्यावर आम्हीं तें आपले दोन तीन मित्रांस दाखविलें; तेव्हां त्यांनीं तें आपले अल्पवयी शिष्याचें नांवावर प्रसिद्ध न करतां तें स्वतःचेच नांवानें प्रसिद्ध करण्यास सुचविलें. याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं तसें केल्यावांचून या चरित्रांतील माहिती विशेष विश्वसनीय आहे असें वाचकांस सहसा वाटणार नाहीं. आमचे मित्रांचें हें ह्मणणें आह्मासही सयुक्तिक दिसलें व हें पुस्तक मुदतींत तयार झालें होतेंच तेव्हां जाहीरात दिल्याप्रमाणें दुसरीं पुस्तकें आलीं होतीं त्यांत हेंही आम्ही परीक्षणास पाठवून दिलें. मात्र पूर्वींपासून हें काम बक्षीसाचे इच्छेनें केलें नसल्यामुळें आपले पुस्तकास बक्षीस मिळाल्यास त्यांतील कांहीं रक्कम रा. लेले यांस देऊन बाकी राहिलेले पैसे पुस्तक छापतांना त्याचे खर्चांतून वजा घालून तेवढ्यानें पुस्तक जितकें स्वस्त होईल तितकें करावें असा आह्मी आपले मनांत

संकल्प केला. पुढें बक्षीस मिळाल्यावर रा. वासुदेवराव जोशी यांस तो संकल्प कळविल्यावरून त्याप्रमाणें रकमेची व्यवस्था करण्याचें त्यांनीं कबूल केलें. येणेंप्रमाणें या पूर्वी मनांत मुळींच कल्पनाही नसतां अगदीं सहज रीतीनें या पुस्तकाचे रचनेचा योग कसा आला याची हकीकत आहे.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं रा. रा. गणेश अनंत वैद्य, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मल्हार खंडेराव चिटणीस, रामचंद्र सदाशीव लेले, गंगाधर सखाराम घाटे, व वासुदेव गणेश जोशी यांपैकीं कित्येकांनीं उत्तेजन देऊन व कित्येकांनीं पुस्तक तपासून जें सहाय केलें त्याबद्दल त्या सर्वांचा ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

ग्रंथकर्ता.

# विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचें चरित्र.

## भाग १ ला.

### बालपण.

आलक्ष्यदंतमुकुलाननिमित्तहासै रव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन्
अंकाश्रयप्रणयिनस्तनयान्वहंतो धन्यास्तदंगरजसा मलिनीभवंति ॥

शाकुंतल.

आमचे या महाराष्ट्र देशांत इंग्रजी विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून जे पुष्कळ विद्वान पुरुष होऊन गेले त्यांमध्यें विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे पेक्षां चरित्र लिहिण्यास अधिक योग्य असा पुरुष क्वचित्च निपजला असेल. जेथें जेथें ह्मणून मराठीं भाषा बोलतात, तेथें तेथें या थोर पुरुषाचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य सांपडणें कठीण. यांचे हातून अल्पवयांतच जीं अनेक व महत्वाचीं कृत्यें घडून आलीं, तशीं गेले पन्नास साठ वर्षांत कोणाचेही हातून घडून आलीं नसतील. सुमारें दहा बारा वर्षांतच यांनीं आपले अलौकिक ग्रंथरचनेनें महाराष्ट्र भाषेस अगदीं वेगळें स्वरूप दिलें; लोकमताचा प्रवाह जो आपले देशाचे खरे हिताविरुद्ध जबरदस्त असा वहात चालला होता त्यास अगदीं उलटी दिशा दिली; आपले देशबांधवांमध्यें स्वदेशाविषयीं, स्वभाषांविषयीं, स्वजातींविषयीं अभिमान जागृत केला; व नवीन शाळा, नवीन छापखाने, नवीन किताबखाने

# विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचें चरित्र.

## भाग १ ला.

### बालपण.

आलक्ष्यदंतमुकुलाननिमित्तहासै रव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन्
अंकाश्रयप्रणयिनस्तनयान्वहंतो धन्यास्तदंगरजसा मलिनीभवंति ॥

शाकुंतल.

आमचे या महाराष्ट्र देशांत इंग्रजी विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून जे पुष्कळ विद्वान पुरुष होऊन गेले त्यांमध्यें विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे पेक्षां चरित्र लिहिण्यास अधिक योग्य असा पुरुष क्वचित्‌च निपजला असेल. जेथें जेथें ह्मणून मराठी भाषा बोलतात, तेथें तेथें या थोर पुरुषाचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य सांपडणें कठीण. यांचे हातून अल्पवयांतच जीं अनेक व महत्वाचीं कृत्यें घडून आलीं, तशीं गेले पन्नास साठ वर्षांत कोणाचेही हातून घडून आलीं नसतील. सुमारें दहा बारा वर्षांतच यांनीं आपले अलौकिक ग्रंथरचनेनें महाराष्ट्र भाषेस अगदीं वेगळें स्वरूप दिलें; लोकमताचा प्रवाह जो आपले देशाचे खरे हिताविरुद्ध जबरदस्त असा वहात चालला होता त्यास अगदीं उलटी दिशा दिली; आपले देशबांधवांमध्यें स्वदेशाविषयीं, स्वभाषांविषयीं, स्वजातींविषयीं अभिमान जागृत केला; व नवीन शाळा, नवीन छापखाने, नवीन किताबखाने

हातीं घेऊन सरकारचे नोकरीवरच भिस्त न ठेवितां खाजगी उद्योगानें आपले विद्वान लोकांस स्वतंत्रपणानें व अन्नानें कसें राहतां येईल, हें प्रत्यक्ष स्वतःचे उदाहरणानें दाखवून दिलें.

विष्णुशास्त्री यांचे हातून हीं वर सांगितलेलीं कृत्यें घडून येण्यास त्यांचे आंगचे सद्गुण व दुर्गुण हीं दोन्हींही कारणीभूत झालीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचे आंगचे मोठे गुण म्हटले म्हणजे बुद्धिप्रागल्भ्य, सतत उद्योगाविषयीं हौस, अलौकिक धैर्य, सद्वर्तनप्रीति, साधा व गरीब स्वभाव, व देशाविषयीं खरा व पूर्ण अभिमान हे होत; या सद्गुणांतच मिसळून व बहुतेक त्यांच्याशीं एकवट होऊन राहिलेले असे कांहीं दोष—स्वतःचे योग्यतेविषयीं व स्वतःचे ग्रंथांविषयीं असावा त्यापेक्षां जास्त अभिमान, हेकेखोरपणा, व्यावहारिक शहाणपणाची एक प्रकारची कमतरता, दुसऱ्यांचे दोषाकडे बारीक व कडक नजर हे—विष्णुशास्त्री यांचे ठिकाणीं होते. या दोन्ही गुणावगुणांचा मिलाफ चरित्रनायकाचे ठिकाणीं नसून फक्त सद्गुणच असते, तर त्यांचे हातून जी महत् देशसेवा आजला झाली आहे ती होण्याचा संभव नसून, त्यांचे हातून माजी बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर किंवा कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचे सारखी ग्रंथरचनेनेंच केवळ एका तऱ्हेची देशसेवा झाली असती. परंतु वरील दोन्ही विद्वान गृहस्थांचे कर्तबगारीपेक्षां पुष्कळच अधिक योग्यतेची जी कर्तबगारी—कीं नवीन खाजगी शाळा घालून कमी खर्चानें व सरकारी शाळांपेक्षां निराळे तऱ्हेनें इंग्रजी विद्येचा प्रसार करणें, होतकरू विद्वान मंडळीमध्यें प्राचीन विद्या, प्राचीन कला, प्राचीन आचारविचार यांविषयीं प्रीति उत्पन्न करून त्यांस त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचे यत्नास लावणें,

व सरकारचे केवळ मिंधे होऊन न बसतां स्वतंत्र धंदे काढून त्यांवर अब्रूनें चरितार्थ कसा चालवितां येईल इत्यादि फार महत्वाच्या गोष्टी त्यांस शिकविणें—ही विष्णुश ` यांचे हातून घडून येण्यास त्यांचे आंगचे गुणांप्रमाणें दोष०। कारणीभूत झाले. हा प्रकार कसा घडला हें पुढील चरित्रावरून दिसून येईल.

आमचे चरित्रनायकाचे गुणावगुणांविषयीं वरील प्रस्तावना पाहून आमचे कित्येक वाचक, ज्यांचे पाहण्यांत इंग्रजींतील बासवेलकृत जॉनसन्चे चरित्रासारखी अप्रतिम चरित्रें आलीं नसतील, त्यांस प्रथमतः सखेद विस्मय वाटण्याचा संभव आहे. कारण आमचे भाषेंत जीं थोडीं चरित्रें लिहिलेलीं आढळतात, त्यांत चारित्रनायकाचे कांहीं ठोकळ सद्गुणांशिवाय बहुधां दुसरें कांहीं सांपडावयाचें नाहीं. त्याचे आंगचे कमी योग्यतेचे गुण व प्रायः सर्वच दुर्गुण यांचा पूर्ण अभाव असायाचा. यामुळें मूळ चरित्रनायकाचें खरें स्वरूप वाचकांचे ध्यानांत येत नाहीं. ज्याप्रमाणें थोरले बाजीरावसाहेब पेशवे वगैरे ऐतिहासिक पुरुषांच्या जुन्या तऱ्हेच्या नुसत्या रूपरेषेनें ( औटलाइनीनें) एकचष्मी काढलेल्या तजाविरींवरून मूळ पुरुषांचें स्वरूप चांगलें ध्यानांत येत नाहीं; त्याचप्रमाणें हल्लीं आपले भाषेंतील बापु गोखले, परशुराम भाऊ पटवर्धन वगैरे पुरुषांचे चरित्रांवरून त्यांचें खरें स्वरूप ध्यानांत येत नाहीं. इंग्रजींतील बासवेलकृत चरित्र हें फोटोग्राफप्रमाणें मूळ स्वरूपाला धरून आहे. त्यांत चरित्रनायकाच्या सर्व लहान मोठ्या गुणावगुणांचें उत्कृष्ट व खरें वर्णन आहे. शिवाय, फोटोग्राफमध्यें जसें निरनिराळे ठिकाणीं प्रकाश व छाया हीं कमजास्त प्रमाणानें वठलीं असल्यामुळें फोटो-

आफांतील चेहऱ्याचा उठाव व खोलपणा स्पष्ट दिसून येऊन मूळ पुरुषाची ओळख सहज पटते व तो आपणापुढें जणूं काय प्रत्यक्ष उभा आहे असा भास होतो, त्याचप्रमाणें उत्कृष्ट चरित्रकाराचे वर्णनानें चरित्रनायकाची मूर्ति वाचकांचे डोळ्यांपुढें उभी राहून तीच प्रत्यक्ष बोलते चालते आहे कीं काय असें त्यांस वाटूं लागतें! ही मूर्ति अर्थांतच सुस्वरूप असावी अशी मर्मज्ञ वाचकांची अपेक्षा नसते; मात्र ती फोटोग्राफचे तजविरीप्रमाणें खरी असली पाहिजे; आणि ही मूर्ति चरित्रनायकाचे खरे स्वरूपाशीं जितक्या मानानें कमीजास्त जुळेल तितक्या मानानें चरित्राची योग्यता कमीजास्त लागते. हे वरील इंग्रजी चरित्रकारांचे सिद्धांत, ज्यांचा आरंभींचे मुखपृष्ठावरील उत्कृष्ट वचनांत निर्देश केला आहे, ते पूर्णपणें ध्यानांत ठेऊन व आमचे मर्मज्ञ वाचकही त्याचप्रमाणें आमचे कर्तबगारीची किंमत करतील अशी पूर्ण खात्री बाळगून, आमचे चरित्रनायक जे विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे चरित्रास आरंभ करितों.

चिपळुणकर हे मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पावस गांवचे राहणारे. येथून विष्णुशास्त्री यांचा सहावा किंवा सातवा पूर्वज सुमारें सतरावे शतकाचे आरंभींच निघून त्रिंबकेश्वरीं येऊन राहिला. यानंतर त्रिंबकेश्वराजवळ श्रीहर्ष ह्मणून जो किल्ला आहे तेथलि फडणविशी विष्णुशास्त्री यांचे पणजे महादाजीपंत यांनीं पेशवाईत संपादन केली. ती पुढें त्यांचे पुत्र त्रिंबकपंत व कृष्णाजीपंत यांजकडे चालू राहिली. यावेळीं चिपळुणकर हे त्रिंबकेश्वरीं नाईक या नांवानें प्रसिद्ध होते. पुढें इ. स १८०२या सालीं जेव्हां दक्षिणेंत होळकरी दंगा झाला तेव्हां त्रिंबकपंत यांचे चिरंजीव हरिपंत यांची फडणविशी वगैरे सर्व जाऊन ते पुण्यास अगदीं निराधार होऊन

पळून आले. तेथें ते धाकटे बाजीरावसाहेब पेशवे यांचे बंधु चिमणाजी आप्पा यांचे पदरीं शागीर्द ह्मणून राहिले. यानंतर प्रभु बाजी यांची सन १८१८ या वर्षी पुण्यांतील कारकीर्द संपून ते चिमणाजी आप्पासह ब्रह्मवर्तास निघून गेल्यावर हरीपंतांनीं पुण्यांतच राहून व तेथें एक अफूचें लहानसें दुकान घालून त्यावर त्यांनीं पुष्कळ वर्षें गरीबींत काढिलीं. त्यांस १८२४ सालीं पंडितरत्न कृष्णशास्त्री चिपळुणकर हे झाले. कृष्णशास्त्री हे लहानपणापासूनच फार हुशार व बुद्धिमान् असे असून त्यांनीं कांहीं वेळ प्रथम वेदपठण करून नंतर पुणें पाठशाळेंत प्रसिद्ध विद्वान मोरशास्त्री साठे यांचे हाताखालीं अनेक शास्त्रांचा अभ्यास केला. यावेळीं कृष्णशास्त्री यांची बरोबरी करणारा पाठशाळेंत दुसरा विद्यार्थी नव्हता. मोरशास्त्री यांनीं एकेप्रसंगीं आपले शिष्याचें बुद्धिप्रागल्भ्य पाहून त्यास प्रेमानें व निर्मत्सर भावानें **बृहस्पति** असें प्रतिष्ठादायक नांव दिलें. येणेंप्रमाणें वेदांचें व शास्त्रांचें अध्ययन कृष्णशास्त्री यांचें संपूर्ण झालें; परंतु येवढ्यानेंच त्यांचा विद्याभ्यास संपावयाचा नव्हता !

सन १८४८ च्या सुमारास पुणें येथील विश्रामबागेचे वाड्यांत संस्कृत पाठशाळा चालू असतांच सरकारांनीं इंग्रजी विद्येचा प्रसार करण्याकरितां एक नवीन इंग्रजी शाळा पुण्यांतच बुधवारचे वाड्यांत सुरू केली, व तेथें कांहीं विद्यार्थी इंग्रजी शिकूंही लागले. पुढें लवकरच संस्कृत पाठशाळेंतही इंग्रजी शिकण्याचा एक वर्ग मेजर क्यांडी यांनीं चालू केला. यावेळीं इंग्रजी शिकण्याबद्दल पुण्यांतील लोकांमध्यें साधारणपणें पुष्कळ वाईट ग्रह होते; तथापि जे चाणक्ष लोक होते त्यांचे लवकरच ध्यानांत आलें कीं, दिवसानुदिवस शास्त्राध्ययनाची योग्यता

कमी कमी होत जाऊन इंग्रजी विद्येची प्रतिष्ठा अधिकाधिक खचित होणार. अशांपैकीं मोरशास्त्री साठे हे होते. त्यांनी स्वतः उतारवय झालें असतांही इंग्रजी विद्येचा अभ्यास सुरू केला आणि आपले प्रिय शिष्य जे कृष्णशास्त्री यांस सांगितलें कीं, "या उपर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा राहणार नाहीं. तूं शहाणा असलास तर इंग्रजी शीक."

गुरूंनीं याप्रमाणें उपदेश केल्यावरून कृष्णशास्त्री यांनीं कमी कुवत होऊं न देतां इंग्रजी विद्येचा अभ्यास करण्यास आपले वयाचे २५वे वर्षी आरंभ केला. शास्त्रीबुवांची बुद्धि अलौकिक व त्यांचा उद्योगही तसाच असल्यामुळें त्यांनीं लवकरच इंग्रजी भाषेंतही चांगली प्रवीणता संपादन केली. यापुढें विश्रामबागेचे वाड्यांतील संस्कृत पाठशाळा मोडून जाऊन तिचे जागीं पूना कालेज स्थापन झाल्यावर त्यांत एकामागून एक जे प्रोफेसर येत गेले त्यांची व विशेषतः प्रोफेसर ग्रीन साहेबांची मर्जी शास्त्रीबोवांवर चांगली बसली.

ग्रीन साहेब हे इतिहास व अर्थशास्त्र या दोन विषयांत मोठे निष्णात असत. ते इतके जबर वाचणारे असत कीं, विद्यार्थ्यांस ह्यूमचे इतिहासांतील किंवा मिलचे अर्थशास्त्रांतील दहा पंधरा पानें दररोज वाचून तयार करून आणण्यास सांगणें हें त्यांस अगदीं कांहीं वाटत नसे. त्यांचा नेहमींचा क्रम ह्मटला ह्मणजे हातांत जितकीं तीस चाळीस पानें एकदम येतील तितकीं दररोज विद्यार्थ्यांस वाचायास नेमून द्यावयाचीं. या जबर वाचनाला कृष्णशास्त्री यांचे शिवाय दुसरा कोणी विद्यार्थी टिकला नाहीं असें सांगतात.

येणेंप्रमाणें कृष्णशास्त्री यांनीं प्रथम वेदपठण, नंतर शास्त्रा-

ध्ययन व शेवटीं इंग्रजी विद्येचा अभ्यास हीं केल्यानें त्यांचे बुद्धीस उत्कृष्ट संस्कार झाले. यामुळें जुने पंडितांत व नवीन विद्वानांत अशा दोहों मंडळींत त्यांची मोठी चहा झाली, व ती पुढें आमरणान्त तशीच कायम राहिली. त्यांचे हातून नुसतें शास्त्राध्ययनच झालें असतें तर अर्थातच जुन्या पंडितांप्रमाणें नुसते विद्वत्तेबद्दलच त्यांची आजन्म ख्याति झाली असती; परंतु तसें झालें असतां ग्रंथरचनेचे द्वारें त्यांचे हातून यापुढें जी मराठी भाषेची उत्कृष्ठ सेवा घडून आली ती होण्याचा संभव मुळींच नव्हता. त्याचप्रमाणें त्यांनीं नुसते इंग्रजी विद्येचाच अभ्यास केला असता तर त्यांस मराठी भाषा शुद्ध, सोपी व प्रौढ अशी लिहिण्याची जशी हातोटी साधली तशी साधली नसती. परंतु शास्त्रीबोवांचा दोन्ही विद्यांशीं उत्तम परिचय झाल्यामुळें त्यांस अर्थात् यापुढें लवकरच मराठी भाषेंत उत्कृष्ठ ग्रंथरचना करण्यास चांगली योग्यता आली.

कृष्णशास्त्री यांस ट्रान्सलेतर एक्झिबिशनरची जागा १८५२ सालीं मिळाली; व नंतर लवकरच ते पूना कालेजमध्यें मराठीचे असिस्टंट प्रोफेसर झाले. या कामावर शास्त्रीबुवा असतां त्यांची विद्यार्थ्यांमध्यें चांगली चहा असे. परंतु या सुमारास मिशनरी लोकांचें महात्म्य पुण्यामध्यें बरेंच झालें होतें, आणि पुष्कळ तरुण व होतकरू विद्यार्थ्यांवर प्रसिद्ध मिशनरी रेव्हरेंड मरी मिचल यांचे व्याख्यानाचें वजन पडून त्यांची आपले धर्मावरून श्रद्धा बरीच उडून जाऊन ते ख्रिस्ती होण्याचा संभव दिसूं लागला होता. हा अनर्थ टाळण्याकरितां त्या वेळचे कित्येक
नर्दी शय असून त्यांनीं ‘ विचारलहरी ’ नांवाचें पत्र काढून मिश-
हस्थ असे चे यत्न निष्फळ केले. या मंडळींत कृष्णशास्त्री हे

बरेच प्रमुख होते; यामुळें त्यांजवर सरकारी अधिकाऱ्यांची गैर-मर्जी झाली. याच सुमारास शास्त्रीबुवांचे हातून बाहेर चालीची कांहीं आगळीक घडल्याची संधि साधून अधिकाऱ्यांनीं त्यांस कामावरून सस्पिंड केलें. परंतु शास्त्रीबोवांनीं या गोष्टीची फारशी परवा केली नाहीं. त्यांनीं कांहीं ग्रंथ लिहून किंवा वर्तमानपत्र चालवून किंवा एकादी खाजगी इंग्रजीशाळा काढून चरितार्थ चालविण्याचा संकल्प केला. परंतु लवकरच शास्त्रीबुवांचे दुसरे कांहीं पुरस्कर्ते साहेब होते त्यांनीं रदबदली करून त्यांस पुन्हा कामावर रुजूं करविलें. यापुढें १८५२ सालीं कृष्णशास्त्री यांची बदली दक्षिणाप्राइझ् कमेटीचे सेक्रेटरीचे जागीं झाली. हें काम त्यांनीं सुमारें सहा वर्षें केलें; आणि हें काम करीत असतांनाच शास्त्रीबुवांनीं बरेच संस्कृत नाटकांचीं मराठी भाषांतरें तपासून शुद्ध केलीं. यानंतर त्यांस १८६१ सालीं पुना ट्रेनिंग कालेजची प्रिन्सिपालची जागा मिळाली. या कालेजांत दादोबाचें व्याकरण शिकवितांना शास्त्रीबुवांस त्या व्याकरणांत ज्या न्यूनता दिसून आल्या त्या दाखवून देण्याकरितां व त्या सुधारण्याकरितां त्यांनीं 'शाळापत्रकांत' मराठी व्याकरणावर निबंध या सदराखालीं २३ निबंध लिहिले. यापुढें १८६८ सालीं शास्त्रीबुवांची बदली 'रिपोर्टर आन दि नेटीव प्रेस' या जागेवर झाली, व या कामावर ते पुढें दहा वर्षें राहिले.

वर सांगितलेल्या मराठी व्याकरणावरील निबंधांखेरीज कृष्णशास्त्री यांनीं मराठी भाषेंत दुसरे बरेच ग्रंथ लिहिले आहेत; परंतु ते बहुतेक भाषांतर रूपानेंच आहेत; मूळ ग्रंथ असा एकहीं नाहीं. तथापि त्यांची भाषा शुद्ध, सोपी, खुबीदार आणि गोड अशी आहे; ती इतकी कीं, ते ग्रंथ भाषांतरें आहेत हें वाच-

[stamp]

कांस भासत मुद्धां नाहीं. शास्त्रीबुवांचे मुख्य ग्रंथ ह्मटले ह्मणजे आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, अनेक विद्यामूल-तत्वसंग्रह, अर्थशास्त्रपरिभाषा, साक्रेटीस याचें चरित्र, व रासेलस याचें भाषांतर; यांशिवाय त्यांचा एक लहानसा परंतु खुबीदार असा ‘ पद्यरत्नावलि ’ नामक कविताग्रंथ आहे. कृष्णशास्त्री यांनीं आपले अलौकिक व मनोरम ग्रंथरचनेनें मराठी भाषेस बरेंच चांगलें रूप आणून ती विष्णुशास्त्री वगैरे पुढील विद्वानांचे उपयोगाकरितां उत्तम तऱ्हेनें कमावून तयार करून दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं; व कृष्णशास्त्री यांचे एकंदर चरित्रावरून त्यांनीं आपले चिरंजीव विष्णुशास्त्री यांनीं पुढें जीं कित्येक उत्तम लौकिक कृत्यें हातीं घेतलीं त्यांची थोडी बहुत सामुग्री आपले ग्रंथरचनेनें, विचारांनीं व कृतींनींही न जाणतांच करून दिली कीं काय असा सहज भास होतो !

आपले चरित्रनायक विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचा जन्म तारीख २० मे १८५० रोजीं पुणें येथें झाला. हे कृष्णशास्त्री यांचे ज्येष्ठ चिरंजीव होत. हे लहानपणीं प्रकृतीनें अशक्त असून या वेळीं त्यांचें स्वरूप मनांत भरण्याजोगें नव्हतें. ते पहिल्यापासून आईबापांचे अंगावर फारसे नसून त्यांचें लालनपालन त्यांचा आजा हरीपंतमामा व आजी भागीरथी मामी हींच करीत असत. हें वृद्ध दंपत्य फार सालस, अक्रूदार व धर्मनिष्ठ असें असे. विष्णुशास्त्री यांचे मनावर धर्म, नीति व आचारविचार यांचे संबंधानें चांगले संस्कार लागण्यास हींच आजाआजी पुष्कळ अंशीं कारणीभूत झालीं यांत संशय नाहीं. हरीपंतमामा हे पुष्कळ अंशीं फार योग्य गृहस्थ असत. ह्यांचा जन्म चांगले संपन्न दशेंत होऊन त्यांस

पुढें आपले बहुतेक आयुष्य गरीबींत काढावें लागलें होतें; परंतु त्यांची वागणूक मोठी नेकीची, अक्रूदार व सरळ अशी असे. त्यांचे वृद्धपणीं कृष्णशास्त्री यांस रोजगार लागून त्यांस पुन्हा चांगली स्थिति प्राप्त झाल्यावरही त्यांचें वर्तन कित्ता घेण्यासारखें असे. त्यांची सर्व भक्ति पुत्रावर असून जेणेंकरून कृष्णशास्त्री यांस सुख होईल तें करण्याकडे त्यांचें नेहमीं लक्ष असे. देवपूजा, सप्तशतीचा पाठ, एकादशणी, पुराणश्रवण वगैरे धर्मकृत्यें आटोपून हरिपंतमामा यांनीं बाजार, हिशेबठिशेब वगैरे सर्व लहान मोठीं संसारकृत्यें संभाळावीं. ते स्वभावतः तापट असून त्यांची मुद्रा पूर्ण गंभीर कदाचित् कांहींशी रागीटही असे. परंतु पुत्राविषयीं त्यांची इतकी कांहीं चमत्कारिक भक्ति असे कीं, स्वतः कोणत्याही तऱ्हेचें व्यसन नसतां चिरंजीवाकरितां विड्याचीं पानें आणून तीं साफ पुसून ठेवणें आणि त्यांचे धोतरांच्या निऱ्या करून ठेवणें येथपर्यंत ही ह्या पुत्रभक्त म्हातान्याची तयारी असे! आणि इतकेंही करून ह्या म्हातारेबोवांचे तोंडांतून कधीं शद्बही बाहेर पडायाचा नाहीं. बापलेकांचे कधीं दोन शब्द कोणतेही संबधानें झालेले आमचे ऐकिवांत नाहींत! येणेप्रमाणें कृष्णशास्त्री यांस हरीपंतमामांचे ममतेमुळें संसारांतील फक्त सुखाचाच मात्र लाभ होत असून दुःखाचा किंवा कटकटीचा भाग त्यांचे वाटेस कधीं येत नसे. यामुळें यावेळीं कृष्णशास्त्री यांचेसारखा सुखी असा मनुष्य आढळणें खरोखरच कठीण होतें! हरीपंतमामांचें हें स्तुत्य वर्तन आपल्यांतील किती वृद्ध मातापितरांनीं घेण्यासारखें आहे!

विष्णुशास्त्री यांची आजी भागीरथी मामी ही ही फार लायक बायको होती; ती हरीपंतमामाप्रमाणें निबोली नसून

साधारणं बोलकी व हुशार असे. नवऱ्याप्रमाणें हिचीही आपले पुत्राचे ठिकाणीं मोठी भक्ति होती; परंतु ती त्यापेक्षां कांहीं अंशीं अधिक धूर्त असे. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " शास्त्रीबुवांस बाहेरचा नाद फार लागल्यामुळें मामा व माई यांस फार दुःख होई. एकदां बरीच रात्र झाली तरी शास्त्रीबोवा घरीं आले नाहींत हें पाहून मामा मनांत फार तळमळून म्हणाले कीं, ' मी याला ( शास्त्रीबोवाला )एकदां बोलूं कां ? " परंतु माई ही अधिक शहाणी ! तिनें उत्तर केलें, ' तुम्ही बोलूं नका; बोलण्यानें तो आपला कांहीं नाद सोडणार नाहीं; तुमचा थोडा बहुत जो वचक आहे तो मात्र नाहींसा होईल ! " विष्णुशास्त्री हे वयांत आल्यावर त्यांचे स्वतःचे आईबापांविषयीं त्यांची भक्ति कमी जास्त असे, परंतु या आजाआजीविषयींचा त्यांचा पूज्यभाव शेवटपर्यंत कायमच होता !

विष्णुशास्त्री यांचे आजे व आजी यांविषयीं वर जी हकीगत दिली आहे ती इंग्रजींतील चरित्रकारांचे प्रघातास अनुसरूनच दिली आहे. चरित्रनायकाचे आंगचे गुणावगुणांचा प्रादुर्भाव व विकास होण्यास ज्या कित्येक अनुकूल किंवा प्रतिकूल व्यक्ति व गोष्टी कारणीभूत झालया असतील त्यांचें यथास्थित विवेचन करणें हें चरित्रकारास अत्यंत जरूर आहे. कारण ज्याप्रमाणें इतिहासकारास राष्ट्रांचा उत्कर्ष व विनाश ह्यांचेंच फक्त वर्णन करणें बस्स नव्हे; तर त्यांस वरील स्थित्यंतराची मीमांसा ही केली पाहिजे, त्याचप्रमाणें चरित्रकारास चरित्रकारांचे अंगीं अमुक अमुक अलौकिक सद्गुण व दुर्गुण होते येवढेंच सांगून पुरें होणार नाहीं; तर चरित्रपुरुषांचे ठिकाणीं त्या गुणावगुणांचें अवतरण व नंतर त्यांचा विकास कसकसा होत गेला व तसें

पुढें आपले बहुतेक आयुष्य गरीबींत काढावें लागलें होतें; परंतु त्यांची वागणूक मोठी नेकीची, अब्रूदार व सरळ अशी असे. त्यांचे वृद्धपणीं कृष्णशास्त्री यांस रोजगार लागून त्यांस पुन्हा चांगली स्थिति प्राप्त झाल्यावरही त्यांचें वर्तन कित्ता घेण्यासारखें असे. त्यांची सर्व भक्ति पुत्रावर असून जेणेंकरून कृष्णशास्त्री यांस सुख होईल तें करण्याकडे त्यांचें नेहमीं लक्ष असे. देवपूजा, सप्तशतीचा पाठ, एकादशणी, पुराणश्रवण वगैरे धर्मकृत्यें आटोपून हरिपंतमामा यांनीं बाजार, हिशेबठिशेब वगैरे सर्व लहान मोठीं संसारकृत्यें संभाळावीं. ते स्वभावतः तापट असून त्यांची मुद्रा पूर्ण गंभीर कदाचित् कांहींशी रागीटही असे. परंतु पुत्राविषयीं त्यांची इतकी कांहीं चमत्कारिक भक्ति असे कीं, स्वतः कोणत्याही तऱ्हेचें व्यसन नसतां चिरंजीवाकरितां विडच्यांचीं पानें आणून तीं साफ पुसून ठेवणें आणि त्याचे धोतरांच्या निऱ्या करून ठेवणें येथपर्यंत ही ह्या पुत्रभक्त म्हातान्याची तयारी असे! आणि इतकेंही करून ह्या ह्यातारेबोवांचे तोंडांतून कधीं शब्दही बाहेर पडायाचा नाहीं. बापलेकांचे कधीं दोन शब्द कोणतेही संबंधानें झालेले आमचे ऐकिवांत नाहींत! येणेप्रमाणें कृष्णशास्त्री यांस हरीपंतमामांचे ममतेमुळें संसारांतील फक्त सुखाचाच मात्र लाभ होत असून दुःखाचा किंवा कटकटीचा भाग त्यांचे वाटेस कधीं येत नसे. यामुळें यावेळीं कृष्णशास्त्री यांचेसारखा सुखी असा मनुष्य आढळणें खरोखरच कठीण होतें! हरीपंतमामांचें हें स्तुत्य वर्तन आपल्यांतील किती वृद्ध मातापितरांनीं घेण्यासारखें आहे!

विष्णुशास्त्री यांची आजी भागीरथी मामी ही ही फार लायक बायको होती; ती हरीपंतमामाप्रमाणें निबोली नसून

सर्वसाधारणें बोलकी व हुशार असे. नवऱ्याप्रमाणें हिचीही आपले मुलाचे ठिकाणीं मोठी भक्ति होती; परंतु ती त्यापेक्षां कांहीं अंशीं अधिक धूर्त असे. विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " शास्त्रीबुवांस बाहेरचा नाद फार लागल्यामुळें मामा व माई यांस फार दुःख होई. एकदां बरीच रात्र झाली तरी शास्त्रीबोवा घरीं आले नाहींत हें पाहून मामा मनांत फार तळमळून म्हणाले कीं, ' मी याला ( शास्त्रीबोवाला ) एकदां बोलूं कां ? " परंतु माई ही अधिक शहाणी ! तिनें उत्तर केलें, ' तुम्ही बोलूं नका; बोलण्यानें तो आपला कांहीं नाद सोडणार नाहीं; तुमचा थोडा बहुत जो वचक आहे तो मात्र नाहींसा होईल ! " विष्णुशास्त्री हे वयांत आल्यावर त्यांचे स्वतःचे आईबापांविषयीं त्यांची भक्ति कमी जास्त असे, परंतु या आजाआजीविषयींचा त्यांचा पूज्यभाव शेवटपर्यंत कायमच होता !

विष्णुशास्त्री यांचे आजे व आजी यांविषयीं वर जी हकीगत दिली आहे ती इंग्रजींतील चरित्रकारांचे प्रघातास अनुसरूनच दिली आहे. चरित्रनायकाचे आंगचे गुणावगुणांचा प्रादुर्भाव व विकास होण्यास ज्या कित्येक अनुकूल किंवा प्रतिकूल व्यक्ति व गोष्टी कारणीभूत झाल्या असतील त्यांचें यथास्थित विवेचन करणें हें चरित्रकारास अत्यंत जरूर आहे. कारण ज्याप्रमाणें इतिहासकारास राष्ट्रांचा उत्कर्ष व विनाश ह्यांचेंच फक्त वर्णन करणें बस्स नव्हे; तर त्यांस वरील स्थित्यंतराची मीमांसा ही केली पाहिजे, त्याचप्रमाणें चरित्रकारास चरित्रकारांचे अंगीं अमुक अमुक अलौकिक सद्गुण व दुर्गुण होते येवढेंच सांगून पुरें होणार नाहीं; तर चरित्रपुरुषांचे ठिकाणीं त्या गुणावगुणांचें अवतरण व नंतर त्यांचा विकास कसकसा होत गेला व तसें

होण्यास कोणकोणत्या गोष्टी व व्यक्ति कारणीभूत झाल्या हेंही सांगणें अगदीं अवश्य आहे; त्यांवांचून कोणतेही थोर पुरुषाचें चरित्र पूर्ण आहे असें लेखलें जाणार नाहीं. यास्तव ज्या कांहीं गोष्टींचे व व्यक्तींचे योगानें विष्णुशास्त्री यांचे गुणावगुण व स्वभाव हीं बनत गेलीं त्यांविषयीं लिहितांना विषयांतर होत नसून, उलटें तसें करणें अगदीं जरूर आहे व ही गोष्ट उत्तम चरित्रकारांनें अनुकरणच आहे, येवढें सांगून विष्णुशास्त्री यांचें चरित्रवृत्त पुढें चालवितों.

विष्णुशास्त्री हे सहा सात वर्षांचे होईपर्यंत ते घरींच शिकत होते. त्यांचा आजा हरिपंतमामा व सदु आण्णा ह्मणून कोणी एक घरीं ठेविलेला विद्यार्थी यांजपाशीं ते उजळणी व साधारण लिहिणें वाचणें शिकले. यानंतर ते बुधवारचे वाड्यांत ' इन्‌फंट स्कूल ' नामक शाळेंत शिकावयास जाऊं लागले. अशा प्रकारच्या शाळा हल्लीं कोठें दिसत नाहींत. साधारण खाऊन पिऊन सुखी अशा गृहस्थांचे मुलांस, त्यांचा नियमित अभ्यासक्रम सुरू होण्यापूर्वीं, शिकण्याकरितां वरील इनफंट स्कुलें उत्तम सोईचीं असत. त्यांत अर्धें शिकणें व अर्धें खेळणें हीं दोन्हीं होत असत आणि विष्णुशास्त्री हे ज्या वेळीं वर लिहिलेल्या शाळेंत होते त्या वेळीं या शाळेंत जे शिक्षक—रावजी साठे—होते ते या दोन्ही कामांला फार योग्य होते असें विष्णुशास्त्री सांगत असत. ही शाळा सोडून विष्णुशास्त्री हे त्या वेळीं सदाशिव पेठेंत नागनाथाचे वाड्यांत एक इंग्रजी मराठी शाळा होती तींत शिकावयास गेले. येथें त्यांची मकलाक सीरीजचीं एक दोन बुकें वर्षसव्वावर्षांत झालीं.

यापुढें सन १८५९ सालीं विष्णुशास्त्री यांचें व्रतबंधन विश्राम-

बागेच्या वाड्यानजीक कर्व्यांचे वाड्यांत मोठ्या समारंभानें झालें. त्यानंतर त्यांस नागनाथाचे वाड्यांतील इंग्रजी-मराठी शाळेंतून काढून त्या वेळचे एका नामांकित गांवठी शाळेंत घातलें व घरीं संध्या, पूजा वगैरे ब्रम्हकर्में त्यांस पढविण्यास सुरवात केली. त्या काळीं सरकारी शाळांतून मोडी अक्षर, मोडी वाचन, तोंडचे हिशेब वगैरे विषय गांवठी शाळांतल्याप्रमाणें चांगले शिकविले जात नाहींत असा जुन्या लोकांचा समज असे. त्याचप्रमाणें ब्रम्हकर्माचे अध्ययनाची हल्लीं ज्याप्रमाणें पुष्कळांस अनावश्यकता वाटते त्याप्रमाणें त्या काळीं वाटत नसे; आणि हरिपंत मामांच्या समजुती अर्थातच वरच्या प्रकारच्या असल्यामुळें विष्णुशास्त्री यांचे विद्याभ्यासांत वर सांगिल्याप्रमाणें एके तऱ्हेनें पिछेहाट झाली. वर लिहिलेली गांवठी शाळा विश्रामबागेचे वाड्याचे शेजारीं आता साहेब पटवर्धन यांचे वाड्यासमोर माडीवर असे. तेथील गुरु हरिपंत लंगडे ह्यांचे स्वरूपाचें, विद्वत्तेचें व एकंदर गुणांचें साम्य 'डिझरटेड व्हिलेज' मधील गांवठी पंतोजिशीं बहुतेक अंशीं जुळण्यासारखें होतें. *

वरील शाळेंत विष्णुशास्त्री हे सुमारें एक वर्ष होते. यानंतर त्यांस त्यांचे वडिलांनीं पुनः इंग्रजी शिकण्यास त्यावेळीं शुक्रवार

* "Well had the boding tremblers learn'd to trace
The day's disaster in his morning face;
Full well the busy whisper, circling round,
Convey'd the dismal tidings when he frowned—
The village all declared how much he knew;
'Twas certain he could write and cipher too;
Lands he could measure, terms and tides presage,
And even the story ran that he could gauge."
Goldsmith's Deserted Village.

होण्यास कोणकोणत्या गोष्टी व व्यक्ति कारणीभूत झाल्या हेंही सांगणें अगदीं अवश्य आहे; त्यांवांचून कोणतेही थोर पुरुषाचें चरित्र पूर्ण आहे असें लेखलें जाणार नाहीं. यास्तव ज्या कांहीं गोष्टींचे व व्यक्तींचे योगानें विष्णुशास्त्री यांचे गुणावगुण व स्वभाव हीं बनत गेलीं त्यांविषयीं लिहितांना विषयांतर होत नसून, उलटें तसें करणें अगदीं जरूर आहे व ही गोष्ट उत्तम चरित्रकारांचें अनुकरणच आहे, येवढें सांगून विष्णुशास्त्री यांचें चरित्रवृत्त पुढें चालवितों.

विष्णुशास्त्री हे सहा सात वर्षांचे होईपर्यंत ते घरींच शिकत होते. त्यांचा आजा हरिपंतमामा व सदु आण्णा ह्मणून कोणी एक घरीं ठेविलेला विद्यार्थी यांजपाशीं ते उजळणी व साधारण लिहिणें वाचणें शिकले. यानंतर ते बुधवारचे वाड्यांत ‘ इन्फंट स्कूल ’ नामक शाळेंत शिकावयास जाऊं लागले. अशा प्रकारच्या शाळा हल्लीं कोठें दिसत नाहींत. साधारण खाऊन पिऊन सुखी अशा गृहस्थांचे मुलांस, त्यांचा नियमित अभ्यासक्रम सुरू होण्यापूर्वी, शिकण्याकरितां वरील इनफंट स्कुलें उत्तम सोईचीं असत. त्यांत अर्धें शिकणें व अर्धें खेळणें हीं दोन्हीं होत असत आणि विष्णुशास्त्री हे ज्या वेळीं वर लिहिलेल्या शाळेंत होते त्या वेळीं या शाळेंत जे शिक्षक—रावजी साठे—होते ते या दोन्ही कामांला फार योग्य होते असें विष्णुशास्त्री सांगत असत. ही शाळा सोडून विष्णुशास्त्री हे त्या वेळीं सदाशिव पेठेंत नागनाथाचे वाड्यांत एक इंग्रजी मराठी शाळा होती तींत शिकावयास गेले. येथें त्यांची मकलाक सीरीजचीं एक दोन बुकें वर्षसव्वावर्षांत झालीं.

यापुढें सन १८५९ सालीं विष्णुशास्त्री यांचें व्रतबंधन विश्राम-

बागेच्या वाड्यानजीक कर्व्यांचे वाड्यांत मोठ्या समारंभानें झालें. त्यानंतर त्यांस नागनाथाचे वाड्यांतील इंग्रजी-मराठी शाळेंतून काढून त्या वेळचे एका नामांकित गांवठी शाळेंत घातलें व घरीं संध्या, पूजा वगैरे ब्रम्हकर्मे त्यांस पढविण्यास सुरवात केली. त्या काळीं सरकारी शाळांतून मोडी अक्षर, मोडी वाचन, तोंडचे हिशेब वगैरे विषय गांवठी शाळांतल्याप्रमाणें चांगले शिकविले जात नाहींत असा जुन्या लोकांचा समज असे. त्याचप्रमाणें ब्रम्हकर्माचे अध्ययनाची हल्लीं ज्याप्रमाणें पुष्कळांस अनावश्यकता वाटते त्याप्रमाणें त्या काळीं वाटत नसे; आणि हरिपंत मामांच्या समजुती अर्थातच वरच्या प्रकारच्या असल्यामुळें विष्णुशास्त्री यांचे विद्याभ्यासांत वर सांगिल्याप्रमाणें एके तऱ्हेनें पिछेहाट झाली. वर लिहिलेली गांवठी शाळा विश्रामबागेचे वाड्याचे शेजारीं आबा साहेब पटवर्धन यांचे वाड्यासमोर माडीवर असे. तेथील गुरु हरिपंत लंगडे ह्यांचे स्वरूपाचें, विद्वत्तेचें व एकंदर गुणांचें साम्य ‘ डिझरटेड व्हिलेज ’ मधील गांवठी पंतोजिशीं बहुतेक अंशीं जुळण्यासारखें होतें. *

वरील शाळेंत विष्णुशास्त्री हे सुमारें एक वर्ष होते. यानंतर त्यांस त्यांचे वडिलांनीं पुनः इंग्रजी शिकण्यास त्यावेळीं शुक्रवार

---

* “Well had the boding tremblers learn’d to trace
The day’s disaster in his morning face ;
Full well the busy whisper, circling round,
Convey’d the dismal tidings when he frowned—
The village all declared how much he knew ;
‘Twas certain he could write and cipher too ;
Lands he could measure, terms and tides presage,
And even the story ran that he could gauge.”
Goldsmith’s Deserted Village.

होण्यास कोणकोणत्या गोष्टी व व्यक्ति कारणीभूत झाल्या हेंही सांगणें अगदीं अवश्य आहे; त्यांवांचून कोणतेही थोर पुरुषाचें चरित्र पूर्ण आहे असें लेखलें जाणार नाहीं. यास्तव ज्या कांहीं गोष्टींचे व व्यक्तींचे योगानें विष्णुशास्त्री यांचे गुणावगुण व स्वभाव हीं बनत गेलीं त्यांविषयीं लिहितांना विषयांतर होत नसून, उलटें तसें करणें अगदीं जरूर आहे व ही गोष्ट उत्तम चरित्रकारांचें अनुकरणच आहे, येवढें सांगून विष्णुशास्त्री यांचें चरित्रवृत्त पुढें चालवितों.

विष्णुशास्त्री हे सहा सात वर्षांचे होईपर्यंत ते घरींच शिकत होते. त्यांचा आजा हरीपंतमामा व सदु आण्णा ह्मणून कोणी एक घरीं ठेविलेला विद्यार्थी यांजपाशीं ते उजळणी व साधारण लिहिणें वाचणें शिकले. यानंतर ते बुधवारचे वाड्यांत ' इन्फंट स्कूल ' नामक शाळेंत शिकावयास जाऊं लागले. अशा प्रकारच्या शाळा हल्लीं कोठें दिसत नाहींत. साधारण खाऊन पिऊन सुखी अशा गृहस्थांचे मुलांस, त्यांचा नियमित अभ्यासक्रम सुरू होण्यापूर्वी, शिकण्याकरितां वरील इनफंट स्कुलें उत्तम सोईचीं असत. त्यांत अर्धें शिकणें व अर्धें खेळणें हीं दोन्हीं होत असत आणि विष्णुशास्त्री हे ज्या वेळीं वर लिहिलेल्या शाळेंत होते त्या वेळीं या शाळेंत जे शिक्षक—रावजी साठे—होते ते या दोन्ही कामांला फार योग्य होते असें विष्णुशास्त्री सांगत असत. ही शाळा सोडून विष्णुशास्त्री हे त्या वेळीं सदाशिव पेठेंत नागनाथाचे वाड्यांत एक इंग्रजी मराठी शाळा होती तींत शिकावयास गेले. येथें त्यांची मकलाक सीरीजचीं एक दोन बुकें वर्षसव्वावर्षांत झालीं.

यापुढें सन १८५९ सालीं विष्णुशास्त्री यांचें व्रतबंधन विश्राम-

बागेच्या वाड्यानजीक कन्येचे वाड्यांत मोठ्या समारंभानें झालें. त्यानंतर त्यांस नागनाथाचे वाड्यांतील इंग्रजी-मराठी शाळेंतून काढून त्या वेळचे एका नामांकित गांवठी शाळेंत घातलें व घरीं संध्या, पूजा वगैरे ब्रम्हकर्में त्यांस पढविण्यास सुरवात केली. त्या काळीं सरकारी शाळांतून मोडी अक्षर, मोडी वाचन, तोंडचे हिशेब वगैरे विषय गांवठी शाळांतल्याप्रमाणें चांगले शिकविले जात नाहात असा जुन्या लोकांचा समज असे. त्याचप्रमाणें ब्रम्हकर्माचे अध्ययनाची हल्लीं ज्याप्रमाणें पुष्कळांस अनावश्यकता वाटते त्याप्रमाणें त्या काळीं वाटत नसे; आणि हरिपंत मामांच्या समजुती अर्थातच वरच्या प्रकारच्या असल्यामुळें विष्णुशास्त्री यांचे विद्याभ्यासांत वर सांगिल्याप्रमाणें एके तऱ्हेनें पिछेहाट झाली. वर लिहिलेली गांवठी शाळा विश्रामबागेचे वाड्याचे शेजारीं आबा साहेब पटवर्धन यांचे वाड्यासमोर माडीवर असे. तेथील गुरु हरिपंत लंगडे ह्यांचे स्वरूपाचें, विद्वत्तेचें व एकंदर गुणांचें साम्य 'डिझरटेड व्हिलेज' मधील गांवठी पंतोजिशीं बहुतेक अंशीं जुळण्यासारखें होतें. *

वरील शाळेंत विष्णुशास्त्री हे सुमारें एक वर्ष होते. यानंतर त्यांस त्यांचे वडिलांनीं पुनः इंग्रजी शिकण्यास त्यावेळीं शुक्रवार

---

* "Well had the boding tremblers learn'd to trace
The day's disaster in his morning face ;
Full well the busy whisper, circling round,
Convey'd the dismal tidings when he frowned—
The village all declared how much he knew ;
'Twas certain he could write and cipher too ;
Lands he could measure, terms and tides presage,
And even the story ran that he could gauge."
Goldsmith's Deserted Village.

पेठेंत नाना महागांवकर यांची खाजगी इंग्रजी शाळा होती तेथें पाठविलें. नाना हे कृष्णशास्त्री यांचे शिष्यांपैकीं असून त्यावेळीं ते हुशार इंग्रजी शिक्षकांत मोडले जात असत. या शाळेंतून सन १८६१ सालीं विष्णुशास्त्री हे पूना हायस्कुलांत गेले. तेथें ते प्रथम जुनियर चौथे वर्गांत म्हणजे हल्लींचे इंग्रजी चौथे इयत्तेंत बसले.[१] या वर्गांत असतां विष्णुशास्त्री सांगत असत कीं, "कधीं कधीं मास्तर आम्हांस मराठींत निबंध लिहून आणण्यास सांगत असत. एके प्रसंगीं 'उद्योगा'विषयीं निबंध लिहावयास दिला असतां मी सहावे पुस्तकांतून वरील विषयावरील निबंध उतरून नेला. तो वाचून मास्तरांस आश्चर्य वाटून ते म्हणाले, "अरे, तूं हा निबंध शास्त्रीबोवांस विचारून लिहिलास काय ?" यावरून त्यावेळचे शिक्षकांचे अगाध मराठी वाचनाविषयींची बरीच कल्पना होण्यासारखी आहे !

या वर्गांतून विष्णुशास्त्री हे दरवर्षी दोन दोन वर्ग[२] वर चढत चालले, ते ज्युनिअर दुसरे वर्गांत असतांना त्या वर्गाचे मास्तर रा. चिमणाजी महादेव यांनीं एकदां ह्मटलें कीं, "जे विद्यार्थी अमुक दिवशीं 'डिझरटेड व्हिलेज' सर्व बिनचूक ह्मणून दाखवतील त्यांस मी एक एक हात रुमाल बक्षीस देईन." त्यावरून नियमित दिवशीं परीक्षा होऊन चार विद्यार्थ्यांस बक्षिसें मिळालीं. यांत विष्णुशास्त्री हे एक होते. हे चिमणाजी महा-

---

१ या वेळीं पूना हायस्कुलांतील वर्गाचे सिनिअर डिव्हिजन व जुनिअर डिव्हिजन असे दोन भाग असत. पहिल्यांत चार व दुसऱ्यांत आठ वर्ग असत. ही व्यवस्था १८६५ चे अखेरपर्यंत चालली होती.

२ या वेळीं हल्लीं चालू असलेल्या इंग्रजी इयत्ता झाल्या नव्हत्या. दर वर्गांत हल्लींची अर्धी इयत्ता ( स्ट्यांडर्ड ) संपे व ह्मणून सहा महिन्यांनीं वर्गांतून मुलें वर चढविलीं जात.

देव मोठे तरतरीत मास्तर असत ह्मणून विष्णुशास्त्री सांगत असत. यानंतर शास्त्रीबुवा हे रा. नारायण कृष्ण गोखले यांचे वर्गात ह्मणजे सिनिअर चौथे वर्गात गेले. रा. नारायण कृष्ण हे मोठे मेहनती व चोख शिक्षक असत ह्मणून त्या वेळीं त्यांची ख्याति असे. या पुढें विष्णुशास्त्री हे क्रमाक्रमानें रा. नाना ठोसर व विनायकराव गोरे यांचे हाताखालीं गेले. या दोघांही शिक्षकांविषयीं विष्णुशास्त्री हे, पहिल्यांचे मार्मिकपणाबद्दल व दुसऱ्यांचे नियमित व रेखिव शिक्षणपद्धतीबद्दल तारीफ करीत असत. यानंतर सन १८६९ सालीं विष्णुशास्त्री हे मे. करख्याम साहेब हेडमास्तर व रा. वामन आबाजी मोडक असिस्टंट हेडमास्तर यांचे शिक्षणाखालीं गेले. साहेब मजकुर हे स्वतः शिकविण्याची मेहनत घेण्यापेक्षां शाळेचें यंत्र सुरळीत चालविण्याचे कामांत विशेष चतुर असत. यासालीं प्रिलिमिनरी परीक्षा झाली, त्या वेळीं रा. वामनराव मोडक यांनीं जी खुबीदार हिकमत केली तिजबद्दल विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं, "परीक्षेचे प्रथम दिवशीं सर्व मुलें कागद, दौती वगैरे सर्व सामान घेऊन तयार होऊन प्रश्नांचे कागदांची वाट पहात बसले असतां, असिस्टंट हेडमास्तरांची स्वारी अंमळ इकडून तिकडून सावकाश अशी फेरी मारून सर्व यथास्थित आहे असें पाहून मध्येंच कांहीं स्मरण झाल्यासारखें करून अंमळ हिकमतीनें विद्यार्थ्यांस ह्मणाली, 'अरे, येथें कोणापाशीं डिक्शनरी आहे काय? मला एक शब्द पहावयाचा आहे.' परंतु कोणी अजागळ मुलानें लपवून ठेवलेली पाकीट डिक्शनरी गुरूंची येवढी अडचण दूर करण्याकारितां चटकन पुढें केली नाहीं! तेव्हां स्वारी अंमळ हंसून प्रश्नांचे कागद वाटूं लागली."

पेठेंत नाना महागांवकर यांची खाजगी इंग्रजी शाळा होती तेथें पाठविलें. नाना हे कृष्णशास्त्री यांचे शिष्यांपैकीं असून त्यावेळीं ते हुशार इंग्रजी शिक्षकांत मोडले जात असत. या शाळेंतून सन १८६१ सालीं विष्णुशास्त्री हे पूना हायस्कुलांत गेले. तेथें ते प्रथम ज्युनियर चौथे वर्गांत म्हणजे हल्लींचे इंग्रजी चौथे इयत्तेंत बसले.[१] या वर्गांत असतां विष्णुशास्त्री सांगत असत कीं, " कधीं कधीं मास्तर आम्हांस मराठींत निबंध, लिहून आणण्यास सांगत असत. एके प्रसंगीं 'उद्योगा'विषयीं निबंध लिहावयास दिला असतां मी सहावे पुस्तकांतून वरील विषया-वरील निबंध उतरून नेला. तो वाचून मास्तरांस आश्चर्य वाटून ते म्हणाले, " अरे, तूं हा निबंध शास्त्रीबोवांस विचारून लिहि-लास काय ? " यावरून त्यावेळचे शिक्षकांचे अगाध मराठी वाचनाविषयींची बरीच कल्पना होण्यासारखी आहे !

या वर्गांतून विष्णुशास्त्री हे दरवर्षी दोन दोन वर्ग[२] वर चढत चालले, ते ज्युनिअर दुसरें वर्गांत असतांना त्या वर्गाचे मास्तर रा. चिमणाजी महादेव यांनीं एकदां ह्मटलें कीं, " जे विद्यार्थी अमुक दिवशीं ' डिझरटेड व्हिलेज ' सर्व बिनचूक ह्मणून दाखवतील त्यांस मी एक एक हात रुमाल बक्षीस देईन. " त्या-वरून नियमित दिवशीं परीक्षा होऊन चार विद्यार्थ्यांस बक्षिसें मिळालीं. यांत विष्णुशास्त्री हे एक होते. हे चिमणाजी महा-

१ या वेळीं पूना हायस्कुलांतील वर्गाचे सिनिअर डिव्हिजन व ज्युनिअर डि-व्हिजन असे दोन भाग असत. पहिल्यांत चार व दुसऱ्यांत आठ वर्ग असत. ही व्यवस्था १८६५ चे अखेरपर्यंत चालली होती.

२ या वेळीं हल्लीं चालू असलेल्या इंग्रजी इयत्ता झाल्या नव्हत्या. दर वर्गांत हल्लींची अर्धी इयत्ता ( स्टॅंडर्ड ) संपे व ह्मणून सहा महिन्यांनीं वर्गांतून मुलें वर चढविलीं जात.

देव मोठे तरतरीत मास्तर असत ह्मणून विष्णुशास्त्री सांगत असत. यानंतर शास्त्रीबुवा हे रा. नारायण कृष्ण गोखले यांचे वर्गांत ह्मणजे सिनिअर चौथे वर्गांत गेले. रा. नारायण कृष्ण हे मोठे मेहनती व चोख शिक्षक असत ह्मणून त्या वेळीं त्यांची ख्याति असे. या पुढें विष्णुशास्त्री हे क्रमाक्रमानें रा. नाना ठोसर व विनायकराव गोरे यांचे हाताखालीं गेले. या दोघांही शिक्षकांविषयीं विष्णुशास्त्री हे, पहिल्यांचे मार्मिकपणाबद्दल व दुसऱ्यांचे नियमित व रेखिव शिक्षणपद्धतीबद्दल तारीफ करीत असत. यानंतर सन १८६९ सालीं विष्णुशास्त्री हे मे. करख्याम साहेब हेडमास्तर व रा. वामन आबाजी मोडक असिस्टंट हेडमास्तर यांचे शिक्षणाखालीं गेले. साहेब मजकुर हे स्वतः शिकविण्याची मेहनत घेण्यापेक्षां शाळेचें यंत्र सुरळीत चालविण्याचे कामांत विशेष चतुर असत. यासालीं प्रिलिमिनरी परीक्षा झाली, त्या वेळीं रा. वामनराव मोडक यांनीं जी खुबीदार हिकमत केली तिजबद्दल विष्णुशास्त्री एकदां सांगत होते कीं, "परीक्षेचे प्रथम दिवशीं सर्व मुलें कागद, दौती वगैरे सर्व सामान घेऊन तयार होऊन प्रश्नांचे कागदांची वाट पहात बसले असतां, असिस्टंट हेडमास्तरांची स्वारी अंमळ इकडून तिकडून सावकाश अशी फेरी मारून सर्व यथास्थित आहे असें पाहून मध्येंच कांहीं स्मरण झाल्यासारखें करून अंमळ हिकमतीनें विद्यार्थ्यांस ह्मणाली, 'अरे, येथें कोणापाशीं डिक्शनरी आहे काय? मला एक शब्द पहावयाचा आहे.' परंतु कोणी अजागळ मुलानें लपवून ठेवलेली पाकीट डिक्शनरी गुरूंची येवढी अडचण दूर करण्याकारितां चटकन पुढें केली नाहीं! तेव्हां स्वारी अंमळ हंसून प्रश्नांचे कागद वाटूं लागली."

या वर्षाअखेर विष्णुशास्त्री हे मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेंत पास झाले. हे हायस्कुलांत शिकत असतांना यांची वागणूक चांगली नियमित, अभ्यासी, गरीब व निबोली अशी असे. त्यांचे घरांतील वागणुकीचाही प्रकार तसाच असे. खाण्यापिण्याचे किंवा पोषाकाचे किंवा कोणतेही प्रकारचे बाबतींत त्यांची तक्रार ह्मणून नसायची. यामुळें त्यांस कधीं कधीं त्रासही सोसावा लागे. ते एकदां सांगत असत कीं, "मी चिमणाजी महादेव यांचे वर्गांत असतां माझे अंगांत एके दिवशीं अंमळ फाटलेला अंगरखा त्यांचे दृष्टीस पडला. त्यावरून ते अंमळ थट्टा करून इतर मुलांकडे वळून ह्मणाले, 'पहा रे या विष्णूला धडका अंगरखा कांहीं मिळत नाहीं. याचे बापाला पैसे मिळत नाहींतसें वाटतें!'

या वेळीं पूना हायस्कुलांत कृष्णशास्त्री वैजापूरकर ह्मणून कोणी शास्त्री असत. ह्यांजपाशीं विष्णुशास्त्री यांनीं संस्कृताचा प्रथम अभ्यास केला. शास्त्री मजकूर ह्यांच्याशीं इतर विद्यार्थ्यांची जशी वागणूक असे तशी विष्णुशास्त्री यांची अर्थातच नव्हती. शास्त्रीबुवांचे थट्टेंत किंवा कुचेष्टेंत ह्मणून ते कधींही मिसळत नसत. ते जें सांगतील तें विष्णुशास्त्री हे भक्तीनें नीट लक्ष लावून ऐकत. कधीं कधीं गुरूंचे घरींही विष्णुशास्त्री यांनीं शिकावयास जावें. वैजापुरकर शास्त्री यांचें आणि कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचें साधारण सूत नसे; तथापि विष्णुशास्त्री यांची शिकण्याची हौस व भक्ति पाहून वैजापुरकर शास्त्री यांनीं गुरुदक्षिणेची वगैरे अपेक्षा न धरितां शक्त्यनुसार विष्णुशास्त्री यांस शिकवावें. याबद्दल विष्णुशास्त्री हे पुढें मोठे झाल्यावर या गुरूंची आठवण करीत असत व त्यांचा ते बराच बोज ठेवीत!

येणेंप्रमाणें विष्णुशास्त्री यांचा प्राथमिक व हायस्कुल अभ्यासक्रम संपूर्ण झाला. त्या वेळचे शिक्षणक्रमांत व हल्लींचे शिक्षणक्रमांत जें बरेंच अंतर पडलें आहे त्या संबंधानें येथें दोन शब्द लिहिणें जरूर आहे. विष्णुशास्त्री यांचे वेळीं म्हणजे सुमारें तीस वर्षांमागें अभ्यासक्रम हल्लींप्रमाणें इयत्तांचे सांखळींत ओंवला गेला नव्हता. वाचनक्रमिकपुस्तकें हीं नुकतींच रचलीं गेलीं होतीं; परंतु तीं अजून इयत्तारूढ झालीं नव्हतीं. मुलांस साधारण लिहितां वाचतां येऊं लागून, त्रैराशिकापर्यंत त्यांची मजल पोंचली ह्मणजे त्यांस हायस्कुलांत इंग्रजी शिकण्यास घालीत असत. भूगोल, इतिहास वगैरे विषयांचें ज्ञान तर राहिलेंच, परंतु व्याकरण, शुद्धलेखन यांचा त्यांस सरासरी गंधही असे नसे. विष्णुशास्त्री हे इंग्रजी चौथे इयत्तेंत येईपर्यंत वरील विषयांचें ज्ञान त्यांस साधारण तऱ्हेचें तरी होतें किंवा नाहीं याचा आम्हास संशयच आहे! त्यांचे समकालिन व सहाध्यायी रा० विष्णु मोरेश्वर महाजनी हे एकदां सांगत होते कीं, "शुद्धलेखन हें मी वर्गांत कधीं शिकलों नाहीं; तें मी साधारण पुस्तकें वाचतां वाचतांच शिकलों." हल्लींचे शिक्षणपद्धतीनें विद्यार्थी एकंदरींत खालपासून तों वरपर्यंत पूर्वींपेक्षां अधिक तरबेज होत जातात यांत कांहीं संशय नाहीं. परंतु प्रत्येक इयत्तेंत अभ्यास बरेच असल्यानें व कित्येक गौण विषयांचा त्यांत समावेश केल्याकारणानें व त्याचप्रमाणें परीक्षकांचीही विद्यार्थ्यांचे प्रवीणतेविषयीं अपेक्षा अधिक असल्याकारणानें सध्यांचा शिक्षणक्रम मुलांचे शारीर व मानसिक शक्तीला बरेच अंशीं अपायकारक होत चालला आहे, अशी पुष्कळांची समजूत आहे.